
UPA National Interdisciplinary Peer-Reviewed E-Journal
Volume-7 (2021) : Issue-5 (October)

IMPACT FACTOR : 5.473 (SJIF)




**CHIEF EDITOR**
Dr. Anil Dodewar

**EDITOR**
Dr. Sucheta Parkar
Dr. C. I. Gitte
Dr. Sharad Meshram

**PUBLISHED BY:**
**UPA GROUP PUBLICATION**
In Association with
**Department of Sociology**
**Kamla Nehru Mahavidyalaya, Nagpur**

**CORPORATE OFFICE:**
38, Mitra Nagar, Manewada Cement Road, Nagpur-24.

**PUBLICATION :**
The UPA Interdisciplinary e-journal is published Bi-annually.

© All Rights Reserved.

The views expressed in this publication are purely personal judgments of the authors and do not reflect the views of Journal or the body under whose auspices the journal is Published.

For downloading the Issue, Click the link given below
http://upa.org.in/special-issue.php?id=MTY=
Visit Us : www.upa.org.in

Share your valuable feedback at
upanagpur@gmail.com
upajournal@gmail.com

## UPA NATIONAL PEER-REVIEWED INTERDISCIPLINARY E-JOURNAL

Published By
UPA Group Publication

In Association With

Department of Sociology
KAMLA NEHRU MAHAVIDYALAYA, NAGNPUR



| | | | |
|---|---|---|---|
| 1 | **डॉ .राजेंद्र ज .कांबळे**<br>इंदिरा गांधी कला – वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर | कोविड -१९ चा सामाजिक -सांस्कृतिक जीवनावर झालेला परिणाम | 1-3 |
| 2 | **डॉ .पुरुषोत्तम वारलू रामटेके**<br>चिश्तिया कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, खुल्ताबाद | सामाजिक समस्या आणि पर्यावरण बदल | 4-7 |
| 3 | **डॉ.प्रदिप रा .भानसे**<br>शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय, अर्जुनी-मोरगाव | कोविड-१९ चा युवकांच्या शिक्षणावर झालेल्या परिणामांचे विश्लेषणात्मक समाजशास्त्रीय अध्ययन | 8-13 |
| 4 | **डॉ .विनोद तुळशीराम राऊत**<br>कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर | कोरोना संक्रमणकाळात युवकांसमोरील, सांस्कृतिक आव्हान आणि संधी | 14-18 |
| 5 | **प्रा .राजू बुरीले**<br>अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय,नागपूर | कोविड-१९ महामारी आणि पर्यावरणातील बदल | 19-25 |
| 6 | **डॉ .मनोहर भी .येरकलवार**<br>डॉ .म .वा .पी .डब्ल्यू .एस .कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर | तरुणांच्या शैक्षणिक प्रगतीवर कोविड-१९ चा प्रभाव : एक समाजशास्त्रीय अध्ययन | 26-30 |
| 7 | **डॉ .कविता आर .बोरकर**<br>डॉ .एम .के .उमाठे कॉलेज, भामटी, रिंग रोड, नागपूर | पर्यावरण बदल आणि कोरोना महामारी | 31-33 |
| 8 | **प्रा .मोनाली यशवंत बहादूरे**<br>नूतन आदर्श कला, वाणिज्य आणि श्रीमती म .ह . वेगड विज्ञान महाविद्यालय, उमरेड | कोविड -१९ महामारीमुळे पर्यावरणामध्ये झालेले बदल | 34-37 |
| 9 | **प्रा .मुग्धा मनिष राजनकर**<br>कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर | कोविड १९ या महामारीमुळे युववार्गाच्या शिक्षणात आलेल्या अडचणी दूर करण्यात ई-स्रोतांची भूमिका | 38-42 |
| 10 | **संदीप सुभापराव तंबाखे**<br>संशोधक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | लॉकडाऊनचा देशातील तरुणांवर झालेला परिणाम | 43-48 |
| 11 | **डॉ .संगिता सोमवंशी**<br>श्री .बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर | कोविड-१९ च्या काळात झालेल्या लॉकडाऊनचा तरुणांवर प्रभाव | 49-52 |
| 12 | **शुभम संजीव मासुरकर**<br>कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर | कोविड १९ च्या काळात सामाजिक विकासात आधूनिक ग्रंथालयाचे महत्व | 53-57 |
| 13 | **डॉ .दिलीप म्हस्के**<br>कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, आंबेजोगाई | कोविड-१९ चा भारतातील महिलांवर झालेला परिणाम | 58-60 |

# कोव्हिड १९ या महामारीमुळे युवावर्गाच्या शिक्षणात आलेल्या अडचणी दूर करण्यात ई-स्त्रोतांची भूमिका

**मुग्धा मनिष राजनकर**
सहायक प्राध्यापक
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग
कमला नेहरु महाविद्यालय, नागपूर
9423688848

---

**सारांश –**

प्रस्तुत संशोधन लेखातंर्गत कोव्हिड १९ या महामारीमुळे युवावर्गाच्या शिक्षणावर जो वाईट परिणाम झाला व त्यामुळे त्यांना शिक्षण घेण्यात ज्या अडचणी आल्या त्या दुर होण्याच्या दृष्टीने माहिती तंत्रज्ञानामुळे जी दालने उपलब्ध झाली आहे त्यासंदर्भात चर्चा करण्यात आली आहे.

**प्रस्तावना -**

२०१९ वर्षाचा अखेर , सर्वांना नवीन वर्षाची चाहूल लागलेली आणि त्यातच वर्षाचा शेवटचा दिवस आणि त्या दिवशी संपूर्ण देशाला अशा एका महामारीने आपल्या अवाक्यात कधी घेतले कळलेच नाही. या महामारीचे नाव कोव्हिड १९ होय. हळूहळू या महामारीचे सावट संपूर्ण देशावर पडू लागले आणि त्याचा सामना करण्यास सर्व यंत्रणा पुढे येऊ लागल्या. या आजारावर उपाय म्हणून लॉकडाऊन करण्यात आले. सर्व नागरिकांना सामाजिक अंतर ठेवण्याचे सरकारी आदेश काढण्यात आले, तसेच सर्वांना कुठेही वावरतांना तोंडावर मास्क लावणे सक्तीचे केले, जेणेकरुन या आजारास कोणी बळी पडणार नाही. या सर्व परिस्थितीचा परिणाम सर्वच क्षेत्रावर पडला. शिक्षण क्षेत्र देखील यातून सुटले नाही.

आजचा युवावर्ग जो समाजाचा भविष्याचा आधार आहे अशा युवावर्गाच्या शिक्षणावर खुप जास्त प्रमाणात परिमाण झाला. सरकारी आदेशामुळे सर्वत्र महाविद्यालय बंद ठेवण्यात आले. विद्यापीठांना परीक्षा घेण्याचे बंधन असल्याने त्यांना अशा परिस्थितीत परीक्षा कशी पार पाडावी, असे अनेक प्रश्न शैक्षणिक क्षेत्रात उपस्थित होऊ लागले. एकीकडे महाविद्यालये बंद तर दुसरीकडे विद्यापीठाद्वारे परीक्षेचे वेळापत्रक जाहिर होऊ लागले अशा वेळी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांपुढे अभ्यास करावा तर कसा, महाविद्यालयात प्रवेश देखील बंद करण्यात आलेला होता. परीक्षेला आवश्यक असलेले वाचन साहित्य मिळवायचे तरी कसे, कारण ग्रंथालयातील प्रवेश बंद करण्यात आला. अशा अनेक अडचणीचा सामना आज युवा वर्ग करित आहे. या आजारावर हळूहळू औषोधपचार होऊ लागले व त्याचा परिणाम समाजामध्ये या आजारामुळे जी दहशत निर्माण झाली होती ती दूर होण्यास मदत होऊ लागली. काही प्रमाणात महाविद्यालय सुरु ठेवण्याचे आदेश सरकार कडून देण्यात आले. मात्र अजूनही शिक्षण ऑनलाईन पध्दतीनेच देणे सुरु ठेवण्यात आले आहे. ऑनलाईन शिक्षणाचे चांगले वाईट असे दोन्ही परिणाम युवा वर्गाच्या शिक्षणावर झालेले आहे.